## निवडणूक निर्णय अधिकारी श्री महांकाली सहकारी साखर कारखाना लि. राजारामबापूनगर, कवठेमहंकाळ, ता. कवठेमहंकाळ, जि. सांगली यांचे कार्यालय द्वारा विशेष लेखापरिक्षक वर्ग १ सहकारी संस्था (साखर), सांगली

२०४, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, विजयनगर, सांगली मिरज रोड सांगली
E-mail ID- spladt.sugsangli१@gmail.com

Returning Officer • Shri Mahankali Sahakari Sakhar Karkhana Ltd. Rajarambapunagar, Kavathe Mahankal 2024-2029

**वाचले :**

१) बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम २००२ व त्या खालील नियम

२) मा.सहकार निवडणुक प्राधिकरण, सहकार मंत्रालय, दिल्ली यांचेकडील दि.२३/१२/२०२४ रोजीचा मंजूर निवडणुक कार्यक्रम

३) हरकतदार श्री. विक्रम लक्ष्मण कोळेकर रा. हिंगणगांव व इतर यांचे दि. १४/०२/२०२५ रोजीचे अर्ज

ज्या अर्थी उपरोक्त वाचले क्र. ०२ अन्वये श्री महांकाली सहकारी साखर कारखाना लि. राजारामबापूनगर, कवठे महांकाळ ता. कवठे महांकाळ जि. सांगली या संस्थेच्या संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणुक सन २०२४-२५ ते २०२९-३० या कालावधीसाठी निवडणुक कार्यक्रम सुरु असून मंजूर निवडणुक कार्यक्रमानुसार दि. ०७/०२/२०२५ ते ११/०२/२०२५ अखेर नामनिर्देशन पत्रे दाखल करणेचा कालावधी होता.

१) नियम १९ (L)नुसार दि. ०७/०२/२०२५ ते ११/०२/२०२५ अखेर मुदतीत दाखल झालेल्या नामनिर्देशन पत्राची छाननी आजरोजी दि. १४/०२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता निवडणुक निर्णय अधिकारी श्री महांकाली सहकारी साखर कारखाना लि. राजारामबापूनगर, कवठे महांकाळ यांचे कार्यालयात सुरु करणेत आली.

२) या छाननीच्या वेळी खालील उमेदवारांबाबत हरकती घेण्यात आल्या.

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव | मतदार संघाचे नांव |
|---|---|---|
| १ | पाटील विजय पुंडलिक | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| २ | सगरे अनिता विजयकुमार | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ३ | खोत मोहन निवृत्ती | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ४ | इरळी अशोक बाळाप्पा | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ५ | पाटील चंद्रकांत हरिशचंद्र | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ६ | पाटील रुद्रगौंडा आप्पासाब | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ७ | पाटील बाळासाहेब रामचंद्र | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ८ | पाटील सुरेश बापूसो | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ९ | पाटील आप्पासो यशवंत | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| १० | भोसले जिवन वसंतराव | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ११ | भोसले किरण जिवन | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| १२ | पाटील संजय आण्णा | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| १३ | कोळेकर काशिलिंग शामराव | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| १४ | कोळेकर अशोक श्रीपती | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| १५ | कोळेकर भिमराव विठठल | उत्पादक सभासिद सर्वसाधारण मतदारसंघ |
| १६ | स्वामी अरविंद सदाशिव | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| १७ | इरळे शामराव पांडूरंग | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| १८ | भोसले रमेश ज्ञानू | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| १९ | शिंदे हणमंत मालू | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |



Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| २० | पाटील भानुदा/हरिबा कृष्णा | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| २१ | कोरे भानुदास भिवा | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| २२ | पाटील संभाजी गजानन | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| २३ | माळी भारत गोविंद | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| २४ | सगरे अनुराधा गणपती | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| २५ | सगरे शंतनु विजयकुमार | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| २६ | पाटील सुहास शिवाजी | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| २७ | ओलेकर दिपकराव गणपतराव | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| २८ | सुपने शिवाजी गणपती | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| २९ | पाटील सागर सुर्यकांत | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ३० | पाटील जयसिंगराव पंडित | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ३१ | बंडगर अदगोंडा रामू | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ३२ | पवार संभाजी सर्जेराव | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ३३ | बंडगर/पाटील प्रकाश पंडित | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ३४ | माने तानाजी शंकर (भाऊ) | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ३५ | आमुने बाळू भिमराव | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ३६ | घागरे कोंडिबा बाबू | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ३७ | चव्हाण दिपक अच्च्युतराव | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ३८ | पवार प्रविण संभाजी | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ३९ | शेटे गणपती शंकर | उत्पादक सभासद सर्वसाधारण मतदारसंघ |
| ४० | पाटील छाया पुंडलिक | उत्पादक सभासद महिला मतदारसंघ |
| ४१ | सगरे अनिता विजयकुमार | उत्पादक सभासद महिला मतदारसंघ |
| ४२ | सगरे अनुराधा गणपती | उत्पादक सभासद महिला मतदारसंघ |
| ४३ | कुनुरे सुनिता अशोक | उत्पादक सभासद महिला मतदारसंघ |
| ४४ | पाटील शशिकला बाळासो | उत्पादक सभासद महिला मतदारसंघ |
| ४५ | बनसोडे निखील संजय | उत्पादक सभासद अनुसुचीत जाती /अनुसुचीत जमाती मतदारसंघ |
| ४६ | माने विजय लोकाप्पा | उत्पादक सभासद अनुसुचीत जाती /अनुसुचीत जमाती मतदारसंघ |
| ४७ | बजबळे संभाजी गुंडा | बिगर उत्पादक सभासद संस्थासहीत मतदारसंघ |
| ४८ | सगरे अनिता विजयकुमार | बिगर उत्पादक सभासद संस्थासहीत मतदारसंघ |
| ४९ | सगरे शंतनु विजयकुमार | बिगर उत्पादक सभासद संस्थासहीत मतदारसंघ |

३) हरकतदार यांचे वतीने अॅड राजेश जमादार होते व अॅड लुईस शहा ज्या उमेदवारावर हरकत घेणेत आली त्यांचे वतीने हजर होते. व अॅड आशुतोष पितांबरे हे कारखान्याच्या वतीने वकील पत्र सादर केले.

४) यामध्ये उपस्थित केलेल्या प्रमुख हरकती खालील प्रमाणे -

१) अर्जदारांनी मागील सलग तीन वर्षात साखर कारखान्यास ऊस पुरवठा केलेला नाही त्यामुळे संस्था पोटनियम ३९ (B) (१) चा भंग झालेला आहे.

२) हरकत घेतलेले अर्जदार श्री नानासो सगरे महांकाली साखर कारखाना कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. राजारामबापू नगर, कवठे महांकाळ या पतसंस्थेचे थकबाकीदार आहेत त्यामुळे संस्था पोटनियम ३९ (B) (८) अन्वये अपात्र आहेत.

Returning Officer
Rajarambapunagar, Kavathe Mahankal 2024-2029
Shri Mahankali Sahakari Sakhar Karkhana Ltd.



Scanned with CamScanner

४) हरकत घेतलेले उमेदवार हे श्री. महांकाली सहकारी साखर कारखाना लि. कवठे महांकाळ यांच्या सलग तीन वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित नव्हते त्यामुळे ते पोटनियम ३९(A) (ii) अन्वये अपात्र आहेत.

५) अर्जदार यांचे वतीने ॲड लुईस शहा यांनी नमुद केले की,

१) कारखाना हा मागील ५ वर्षापासून बंद असलेने आम्ही ऊस पुरवठा केलेला नाही तसेच हरकत घेणाऱ्यांनी ही काखान्यास ऊस पुरवठा केलेला नाही यान्यायाने हरकतदार ही अपात्र ठरतात.

२) बहुराज्यीय सहकारी संस्था, अधिनियम २००२ चे कलम ४३ (१) (g) व (h) अन्वये अर्जदारांनी श्री महांकाली सहकारी साखर कारखाना लि. कवठे महांकाळ कडून कोणतेही कर्ज अथवा वस्तु घेतली नाही तसेच बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम २००२ चे कोणत्याही न्यायालयाचे आदेश, निर्णय अथवा आदेशान्वये थकबाकी घोषित झालेली नाही. त्यामुळे तक्रारदारांची ही हरकत अमान्य करणेत यावी.

३) साखर कारखान्याच्या दोन वार्षिक सभा कोव्हिडमुळे ऑनलाईन झालेल्या आहेत. तसेच त्यानंतरच्या वार्षिक सर्वसाधारण सभा झालेल्या आहेत. कोव्हिड काळात सभा ऑनलाईन झाल्याने सर्वांची उपस्थिती कारखान्याने ग्रहित धरलेली आहे. तसेच इतर ज्या सभा झाल्या त्यामधील उपस्थिती वगळता सर्व गैरहजर सभासदांची अनुपस्थिती क्षमापित केलेली आहे. त्यामुळे पोटनियम ३९ (A)(१) (ii) नुसार आम्ही पात्र आहोत.

६) कारखान्याच्या वतीने ॲड आशुतोष पितांबरे यांनी सांगितले की,

१) कार्यकारी संचालक श्री. महांकाली सहकारी साखर कारखाना लि. कवठे महांकाळ यांनी दि. १३/०२/२०२५ रोजी नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या उमेदवारांची माहिती तक्त्याच्या स्वरुपात दिलेली आहे. यातील स्तंभ क्र. ०७ मध्ये कारखाना सलग ५ वर्ष बंद असलने कोणाचाही ऊस मागील ३ सलग हंगामात आलेला नाही.

२) तक्त्यातील स्तंभ क्र. ०३ व ०४ नुसार २ वार्षिक सभा ऑनलाईन झाल्याने सर्वांची उपस्थिती गृहित धरलेली आहे. तसेच इतर ज्या सभा झालेल्या आहेत त्यामधील उपस्थिती वगळता सर्व गैरहजर सभासदांची अनुपस्थिती क्षमापित केलेली आहे.

३) तक्त्यातील स्तंभ क्र. ०८ नुसार अर्जदार हे संस्थेचे थकबाकीदार आहेत अथवा कसे याबाबत माहिती दिली आहे. मात्र Securitization Act खाली कोणत्याही उमेदवारावर कारवाई करणेत आलेली नाही.

७) हरकतदारांच्या वतीने ॲड राजेश जमादार यांनी पुन्हा युक्तीवाद सादर केला की,

१) सामनेवाले यांनी मान्य केले आहे की, कारखान्याला ऊस पुरवठा झालेला नाही त्यामुळे सर्वच उमेदवार यांचे नामनिर्देशनपत्रे अपात्र होतील.

२) कारखान्याने दि. १०/०२/२०२५ च्या पत्रात नमुद केले आहे की, हा कारखाना सन २०१९-२० पासून बंद असून सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सांगली बँकेच्या ताब्यात आहे. त्यामुळे कारखान्याबाबतचा माहितीचे रेकॉर्ड बँकेच्या ताब्यात असलेने माहिती देता येत नाही.

३) पोटनियमाच्या तरतुदी हया निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांवर बंधनकारक आहेत. निवडणुक निर्णय अधिकारी यांना छाननीवेळी पोटनियमांच्या पलिकडे निर्णय घेणेची कार्यकक्षा नाही. सर्व उमेदवारांनी ऊस पुरवठा केलेला नाही. त्यामुळे तार्किक दृष्टया सर्व उमेदवार अपात्र आहेत. नामनिर्देशन पत्र हे पोटनियमाच्या चौकटीतूनच (Framework) विचारात घेतले पाहिजे. सहकारातील गव्हर्नन्स व अकौंटॅबलेटी (Governance and Accountability) खाली सर्व संचालक जबाबदार आहेत. त्यामुळे हरकत घेतलेल्या उमेदवारांचे अर्ज रदद करणेत यावेत.

Returning Officer
Rajarambapunagar, Kavathe Mahankal 2024-2029
Shri Mahankali Sahakari Sakhar Karkhana Ltd.



Scanned with CamScanner

८) वरील सर्व युक्तीवाद विचारात घेऊन व उपलब्ध झालेली कागदपत्रे, कारखान्याचे अहवाल, पोटनियम व इतर अनुषंगीक कागदपत्रांचे मी अवलोकन केले आहे. व यापुढील माझे निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

१) निवडणुक निर्णय अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्र छाननी करीत असताना त्यांचे समोर दाखल कागदपत्रांच्या अन्वये निर्णय घेणे अपेक्षित आहे. असे कायद्याचे सर्व मान्य तत्व आहे. (Settled Principle of Law) त्यामुळे या मर्यादेत मला कामकाज करावे लागत आहे.

२) हरकतदार यांनी उपस्थित केलेली तक्रार ही नैसर्गिक न्याय तत्वानुसार अनुसरुन छाननीच्या वेळी सर्व उमेदवारांच्या नामनिर्देशन पत्रांना लावणे आवश्यक आहे. त्यामुळे अनेक हरकत अर्ज येऊन ही एक सर्व समावेश निकालपत्रक व आदेश या प्रकरणी देणे आवश्यक आहे.

३) कार्यकारी संचालक श्री. महांकाली सहकारी साखर कारखाना लि. कवठे महांकाळ यांनी दि. १३/०२/२०२५ रोजी दिलेल्या माहितीनुसार हरकत घेतलेल्या उमेदवारासोबत उत्पादक सर्वसाधारण मतदार संघातील (८३), उत्पादक सभासद महिला मतदार संघ (९), उत्पादक सभासद अनु जाती /जमाती मतदार संघ (७) बिगर उत्पादक सभासद संस्थासंहित मतदार संघ (५) कारखाना सलग ५ वर्ष बंद असलेने मागील ३ हंगामात ऊस घातलेला नाही. त्यामुळे हे सर्व उमेदवार पोटनियम ३९-B(१) च्या तरतुदी पुर्तता करीत नसलेने ते संचालक मंडळाचे सदस्य होणेस अपात्र आहेत.

पोटनियम ३९ –B (१) ची तरतुद ही फक्त हरकत घेतलेल्या उमेदवारांकरीता करता येत नसलेने सर्व उमेदवारांना लागू करणे कायद्यानुसार आवश्यक आहे. तसेच पोटनियमाची ही तरतुद शिथिल करणेचा अधिकार कायद्यानुसार निवडणुक निर्णय अधिकारी यांना नाही. त्यामुळे पोटनियमातील ही तरतुद फक्त हरकतदारांपुरतीच मर्यादित नसून सर्व उमेदवारांना बंधनकारक आहे, हा हरकतदार विधिज्ञांचा युक्तीवाद ग्रहय धरणेत येत आहे.

४) बहुराज्यीय सहकारी संस्था, अधिनियम २००२ चे कलम ४३ (१) (h) मध्ये नमुद केले आहेत की,

No member of any multi-state co operative society or nominee of a member, society or a national co operative society shall be eligible for being chosen as or for being, a member of the board of such multi-state co operative society or a national co operative society, or of any other co operative society to which the multi-state co- operative society is affiliated, if such member- :

(a)

.

.

.

.

(h) is a person against whom any amount due under a decree, decision or order is pending recovery under this Act (or under any other Act specified in the Third Schedule)

हरकतदारांच्या विधिज्ञांनी प्रस्तुत प्रकरणी बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम २००२ अन्वये वसुली प्रलंबित असलेबाबत कोणताही पुरावा सादर केलेला नाही त्यामुळे ही हरकत विचारात घेता येणार नाही.

Returning Officer • Shri Mahankali Sahakari Sakhar Karkhana Ltd • Rajarambapunagar, Kavathe Mahankal 2024-2029



Scanned with CamScanner

५) कार्यकारी संचालक श्री. महांकाली सहकारी साखर कारखाना लि. कवठे महांकाळ दि.१३/०२/२०२५ सादर केलेल्या माहितीत स्तंभ क्र. ०३व ०४ मध्ये नमुद केले आहे की, " दोन वार्षिक सभा ऑनलाईन झालेने सर्वांची उपस्थिती ग्रहित धरलेली आहे. तसेच इतर ज्या सभा झाल्या त्यामधील उपस्थिती वगळता सर्व गैरहजर सभासदांची अनुपस्थिती क्षमापित केलेली आहे."

कार्यकारी संचालक श्री. महांकाली सहकारी साखर कारखाना लि. कवठे महांकाळ यांनी प्रस्तुतची माहिती दिलेली असलेने तसेच त्याला छेद देणारा कोणताही पुरावा तक्रारदाराने दिलेला नसलेने कार्यकारी संचालकांची माहिती प्रथमदर्शनी ग्राहय धरणेत येत आहे. त्यामुळे हरकत घेतलेल्या उमेदवार यांचे बरोबर इतर सर्व पोटनियम ३९- A (१) (n) चा भंग करत नाहीत असे म्हणता येते.

६) पोटनियम क्र. ३९-(B) (१) मध्ये Bye Law ९ (a) चा उल्लेख आहे. परंतु पोटनियमामध्ये ९(a) ची तरतुद दिसून येत नाही.

९) वरील विवेचनास अनुसरुन प्रस्तुत प्रकरणी हरकत घेतलेल्या उमेदवारांबरोबरच इतर सर्व उमेदवारांनी पोटनियम ३९-B (१) चा भंग केल्याने त्यांचे नामनिर्देशन पत्र अस्विकृत करणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तुत साखर कारखाना मागील ५ वर्षापासून बंद असल्यामुळे पोटनियम ३९ (B) (१) ची तरतुद शिथिल करणेसाठी कार्यकारी संचालक यांनी सक्षम प्राधिकारी यांचेकडे पाठपुरावा करावा. त्यामुळे या प्रकरणात खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

सर्व नामनिर्देशन पत्रे अस्विकृत करण्यात येते आहेत. कार्यकारी संचालक यांनी पोटनियमातील तरतुदी शिथिल करणेसाठी सक्षम प्राधिकारी यांचेकडून पाठपुरावा करावा. निकालाची समज सर्व संबंधीतांना देणेत येत आहे.

ठिकाण- सांगली
दिनांक- १४/०२/२०२५
जा.क्र. २८

AshokWKakade

**( अशोक काकडे ) भा.प्र.से.**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**श्री. महांकाली सहकारी साखर कारखाना लि.**
**राजारामबापूनगर कवठे महांकाळ तथा**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, सांगली**

Returning Officer
Sri Mahankali Sahakari Sakhar Karkhana Ltd.
Rajarambapunagar, Kavathe Mahankal
2024-2029



Scanned with CamScanner